महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७ वे | दिनांक : २६/१२/२०२५ | वार : शुक्रवार

## अजित पवार गटाकडून ४० 'स्टार प्रचारकांची' यादी जाहीर



**मुंबई** : राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून १५ जानेवारी रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने आपली रणनीती स्पष्ट करत ४० 'स्टार प्रचारकांची' यादी जाहीर केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली आहे.
निवडणुकीच्या रणधुमाळीत आपल्या पक्षाचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाने अनुभवी नेत्यांसह युवा चेहऱ्यांनाही या ४० स्टार प्रचारकांच्या यादीत स्थान दिले आहे. आगामी काळात होणाऱ्या सभा आणि प्रचाराच्या फेऱ्यांमध्ये हे नेते राज्यभर फिरून पक्षाची भूमिका मांडणार आहेत. सुनील तटकरे यांनी या यादीची घोषणा केल्यानंतर आता कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
दरम्यान, या निवडणुकीत अनेक अनपेक्षित युती पाहायला मिळत आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांनी एकत्र येत युतीची घोषणा केली आहे. तर दुसरीकडे भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात युतीबाबत अंतिम चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही राष्ट्रवादी गटांनी देखील एकत्र निवडणूक लढवण्याबाबत चर्चा सुरू केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## ही भूक कधीही न संपणारी : नितीन गडकरी

मुंबई : आपल्या परखड मतांमुळे आणि सर्वांनाच धारेवर धरणारे नेते म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ओळखले जाते. आता त्यांनी पुन्हा एकदा असेच वक्तव्य केले आहे. सध्या महाराष्ट्रात महापालिका निवडणुकीचे वातावरण सुरू असून इच्छुक उमेदवारांची गर्दी देखील वाढली आहे. यावर गडकरींनी त्यांच्या मिश्किल शैलीत वक्तव्य केले आहे. आजकाल पक्षाची आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु, आम्ही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला असल्याचे वक्तव्य त्यांनी केले आहे. तसेच उमेदवारी मिळवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर बोलताना गडकरी म्हणाले, ही कधीही न संपणारी भूक.
दादा कोंडके यांच्या चित्रपटाचा दाखला देत नितीन गडकरी म्हणाले, गर्दीतील प्रत्येक व्यक्तीला वाटत असते की आपल्यालाच तिकीट मिळावे. मात्र जनता आता तितकीच हुशार झाली आहे. आजकाल पक्षाची आर्थिक स्थिती खूप चांगली आहे.परंतु आम्हीही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला आहे.
पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, एकदा मला एक व्यक्ती भेटली. त्याने चहा आणि जिलेबी खाऊ घातली, पण 'माझे काय होणार?' असा प्रश्न ती व्यक्ती विचारत होता. मी त्याला म्हणालो, तू खाऊ घाल, सर्व ठीक होईल. मात्र, त्यावेळी आमच्या हातात काहीच नव्हते. तरीही तिकीट देणारे आम्ही नाहीत, हे त्यांना माहीत नव्हते. आजही अनेक लोक ताणून बसले आहेत. लोकांना वाटते की नितीनजी किंवा देवेंद्रजी सांगतील तर तिकीट मिळेल, असे वाटणे स्वाभाविक आहे, असेही गडकरी यावेळी म्हणाले.
ही भूक कधीही न संपणारी
एक महिला माझ्याकडे आली आणि मला एकदा नगरसेवक बनवा अशी इच्छा व्यक्त केली. आम्ही तिला नगरसेवक बनवले. मात्र महापौर बनवू शकलो नाही. त्यामुळे ती खूप रडू लागली. तिचे रडणे पाहून माझ्या आईने विचारले, हिच्या नवऱ्याचा मृत्यू झाला का? मी आईला सांगितले, नाही, हिला तिकीट मिळाले नाही म्हणून रडत आहे. नंतर तिला महापौर बनवले. त्यानंतर तिने आमदार होण्याची इच्छा व्यक्त केली. आणि आता ती नगरसेवकाच्या तिकीटासाठी तयार आहे, असे सांगत गडकरी म्हणाले की ही भूक कधीही न संपणारी आहे. महत्वाकांक्षा असणे स्वाभाविक आहे. कार्यकर्त्यांमध्ये आशा, अपेक्षा आणि आकांक्षा असणे चुकीचे नाही.
आधी काम करा, अन्यथा तिकीट मागू नका
पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, नगरसेवक बनायचे झाले तर आधी काम करा, अन्यथा तिकीट मागू नका. मला एका ठिकाणी समजले की नवरा, बायको, मुलगा आणि बहीण अशा चौघांनीही तिकीट मागितले होते. तेव्हा मी मस्करीत म्हणालो, अजून दोन जण उरलेत, ड्रायव्हर आणि चमच्यालाही तिकीट मागायचे राहिले की काय? असा टोला गडकरींनी भाषणात लगावला.
कोणी कुठे जन्म घेतला, हा गुन्हा नाही. मात्र, स्वतःच्या पत्नीला तिकीट मिळावे म्हणून आग्रह धरण्यापेक्षा, लोकांनीच 'यांना तिकीट द्या असे सांगावे, अशी परिस्थिती निर्माण होणे अधिक योग्य आणि लोकशाहीला साजेसे आहे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्म शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमात नितीन गडकरी बोलत होते.

## पक्षप्रवेशांमुळे भाजपमध्ये हुकूमशाही, तो सत्तेसाठी झपाटलेला : विजय वडेट्टीवार



**मुंबई** : राज्यातील आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजपमध्ये सत्तेसाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जात असून, बाहेरून येणाऱ्यांना डोक्यावर बसवले जात असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. निष्ठावंतांना घरी बसवा आणि बाहेरच्यांना वर बसवा, हेच आज भाजपचं धोरण झालं आहे, असा घणाघाती आरोप करत त्यांनी भाजपच्या पक्षप्रवेश मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. सत्तेच्या हव्यासापोटी भाजप कोणालाही जवळ करत असल्याचा टोला देत त्यांनी पक्षातील अंतर्गत अस्वस्थतेकडे लक्ष वेधलं आहे.
नाशिकमध्ये नुकत्याच घडलेल्या भाजप पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी स्थानिक आमदार आणि कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. नाशिकमध्ये भाजपच्या पक्षप्रवेश कार्यक्रमामुळे एका आमदाराच्या डोळ्यात पाणी आलं, ही परिस्थिती खूप काही सांगून जाते, असं म्हणत त्यांनी भाजपवर हुकूमशाही पद्धतीने निर्णय घेतल्याचा आरोप केला. स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता वरून लादलेले निर्णय घेतले जात असल्याने भाजपमध्ये अंतर्गत लोकशाही संपुष्टात आली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सत्तेसाठी कोणताही विचार न करता पक्षप्रवेश स्वीकारले जात असल्याने भाजप हा सत्तेसाठी झपाटलेला पक्ष बनल्याची टीका वडेट्टीवार यांनी यावेळी केली.
भाजपवर आणखी आक्रमक शब्दांत टीका करताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ता मिळवण्यासाठी भाजपला सगळे चालतात. चोर, बलात्कारी, खुनी, तसेच ईडी आणि सीबीआयच्या कारवायांशी संबंधित लोकही भाजपसाठी चालतात. या शब्दांत त्यांनी भाजपच्या राजकारणावर गंभीर आरोप केले. भाजप सत्तेचा वापर तपास यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणण्यासाठी करत असल्याचा आरोप करत त्यांनी भाजपच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. भाजपसाठी सत्ता हाच एकमेव अजेंडा राहिल्यामुळे पक्षातील मूळ कार्यकर्ते आणि निष्ठावंत नेते बाजूला पडत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.
दरम्यान, मुंबईतील दादर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. या बैठकीत राज्यातील आगामी महापालिका निवडणुकांचा सखोल आढावा घेण्यात आला. स्थानिक परिस्थिती, संभाव्य उमेदवार, संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची मनोभूमिका यावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली. प्रत्येक महानगरपालिकेची राजकीय स्थिती वेगळी असल्याने एकसारखा निर्णय लादला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी स्थानिक नेतृत्वाला महत्त्व दिले जाणार असल्याचे सांगितले.
काँग्रेस कोणत्याही दबावाखाली निर्णय घेणार नाही
महापालिका निवडणुकांबाबत काँग्रेसची रणनीती स्पष्ट करताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, जिथे शक्य असेल तिथे आघाडी करून निवडणूक लढवली जाईल आणि जिथे आघाडी शक्य नाही, तिथे काँग्रेस स्वबळावर निवडणुकीला सामोरे जाईल. स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची भावना लक्षात घेऊनच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. काँग्रेस कोणत्याही दबावाखाली निर्णय घेणार नसून, जनतेच्या प्रश्नांवर आणि स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवर निवडणूक लढवणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. भाजपच्या सत्ताकेंद्रित राजकारणाच्या विरोधात काँग्रेस लोकशाही, संघटन आणि स्थानिक नेतृत्वावर आधारित लढाई उभी करेल, असा निर्धार वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ डिसेंबर २०२५

# शिवा वेलनेस अँड फिटनेस सेंटरचे शरणभैया पाटील यांच्या हस्ते उद्घाटन




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उद्घाटन प्रसंगी बोलत असताना... आपल्या बदलत्या जीवनशैलीमध्ये मला वाटतं आज पूर्वी पन्नाशीच्या नंतरचे आजार व्हायचे आज आमच्या ३० वयातल्या मुलांना आजार होत आहेत शुगर ब्लडप्रेशर डिप्रेशन अनेक आजार आपल्याला होत आहेत पूर्वीच्या काळामध्ये तिथे आमचे ज्येष्ठ लोक आहेत ते शेतामध्ये काम करायचं आपल्याशी साधं जेवण आहे ते जेवायचे आणि तंदुरुस्त राहायचे.

आज मला अशी परिस्थिती झालेली आहे की आम्हाला तरुणांमध्ये दिसण्याचे फार मोठे प्रमाण वाढणे आणि त्याच्या वरती सगळ्यात मोठे म्हणजे स्ट्रेस आपण टेन्शन फार घेतो तर हरिश्चंद्र मामा सोनवणे जागतिक आरोग्य सल्लागार यांनी बोलून सुद्धा दाखवले एक विषय त्यांनी सांगितले आपल्याला की आरोग्याच्या बाबतीमध्ये ही त्यांच्याशी हरबल लाईफ चे प्रोडक्ट्स आहेत स्वतः मामांचे फोटो मी बघितल आज मामा एकदम तरुण दिसतात तुम्ही मामाच १०० वजन होते ते आता वजन कमी करून दिल्ली वर्कआउट व सकस संतुलित आहार येऊन ७० किलो वरती आलेत आता मी स्वतः मला अनुभवलेली मी आज त्यांचे व्हिडिओ बघतो मी कधीकधी करतात तर आपल्या सगळ्यांना आपण सगळे काम करतो आपल्या घरामध्ये आता आमच्या माता भगिनी काम करता आपण बाहेर काम करतो शेतामध्ये काम करतो आपण नोकरीला जातो किंवा आपले जे काही काम असेल पण सकाळी माझ्या सर्वांना विनंती आपण सगळ्यांनी एक तास तरी आपल्या शरीराला वेळ दिला पाहिजे लग्न झाल्यानंतर जर मुलगा झाला रात्री वेळ होतो दररोज ५ किलोमीटर रनिंग करतोय त्यामुळे लोकांनी राजकीय असं मॅडम आहेत कारण ज्यावेळेस आपला अधिक पोट वाढतं कारण म्हणून आजार आपल्या पोटातून निर्माण होतात हे मामांची चर्चा करत होतो की आजार हे शक्यतो आपल्या पोटापासून सुरू होतात अपचन ऍसिडिटी अनेक आजार आहेत यापुढे आपलं तसा आजार सुरुवात झाला आणि आपल्याला मग हॉस्पिटलला जायचं डॉक्टर दाखवा अनेक प्रॉब्लेम करा पण आपल्या हरबल लाईफच्या माध्यमातून, मला फार आनंद झाला. आज लोकांना काळाची गरज आहे आपले देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी म्हणल्याप्रमाणे मला मुरूमच्या आमच्या परिसरामध्ये आपल्या या स्वावलनेस अँड फिटनेस सेंटर मुरूम परिवारामध्ये मी पण आपल्या सोबत राहणार आहे जरी व्यासपीठाचे जरी मी आपल्या सोबत राहतो कारण शेवटी आपल्याला या माध्यमातून जायचं आहे आणि मला आपल्याला एक उदाहरण देतो मी आपण सगळ्यांना आता धीरूभाई अंबानी माहिती सगळ्यांना माहित आहेत त्यांचा एक मुलगा बघितला आपण त्यांच्याकडे अफाट संपत्ती त्याच्याकडे तुम्ही एक मोठी गाडी म्हणलं त्याच्याकडे १५ १५ कोटी वाहन आहेत त्यांच्या लग्ना मध्ये त्यांनी सांगितलं की सगळं आहे पण शरीर नाही तर भावांनो संपत्ती पद प्रतिष्ठा पेक्षा सगळ्याच चुकीचं असेल तर तो सगळ्यात चांगलं सुखी माणूस असेल त्याचं वजन होते तो आजारापासून मुक्त आहे तोच खरे मानवी सुखी जीवनात आपल्या याच्यात जगता पैसा आहे आपण ठीक आहे मला पाहिजे म्हणून आमच्या शिवा वेलनेस सेंटरला मी स्वप्नील शिवा यांना आश्वासित करतो मी तुमच्या परिवारात मला तुम्हीच घ्या आणि सुरुवात या निमित्ताने आमचे सर्व माता-भगिनी उपस्थित आहेत...... शेवटी त्यांनी शिवावेलनेस वचिटणीस सेंटरला शुभेच्छा दिल्या....

## शिक्षणमहर्षी तात्याराव मोरे आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**उमरगा :** भारत शिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षणमहर्षी कै. तात्यारावजी मोरे यांच्या स्मरणार्थ श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार (दि.02 जानेवारी) रोजी आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्वातंत्र्यपूर्व काळातील भारत शिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षणमहर्षी कै. तात्यारावजी मोरे यांच्या स्मरणार्थ गेल्या 40 वर्षापासून ज्वलंत विषयावर वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.विद्यार्थ्यामधील वक्तृत्व व नेतृत्व गुण विकसित करण्याच्या हेतूने तसेच विद्यार्थ्यात सामाजिक प्रश्नांची जाण निर्माण व्हावी, या उद्देशाने संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्ष सन 1984 पासून दरवर्षी शिक्षणमहर्षीतात्यारावजी मोरे आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा वादविवाद स्पर्धेचे 41 वे वर्ष असल्याने एका ज्वलंत विषयावर स्पर्धा घेण्यात येत आहे. जगातील माहिती तंत्रज्ञानाने मोठी झेप घेत एआय (आर्टिफीसियल इंटेलिजन्स) तंत्रज्ञान विकसित केले आहे. आज जरी मानवी मेंदूचा ताण, थकवणारे कार्य कमी करण्यासाठी याचा उपयोग केला जात असला तरी त्याचे दूरगामी परिणाम भयावह असू शकतील. यावर चर्चा घडवून आणण्याच्या उद्देशाने तरुणाईलाच बोलते करण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता युवा पिढीच्या बौद्धिक विकासासाठी तारक आहे/नाही' या विषयावर हीस्पर्धा होणार आहे. धाराशिव, लातूर, बीड वसोलापूर जिल्हयातील कनिष्ठ व वरिष्ठमहाविद्यालयातील प्रत्येकी एका संघास सहभाग घेता येणार आहे. संघात दोन स्पर्धकाचा समावेश असेल, यातील एकाने विषयाच्या अनुकूल तर दुसऱ्याला प्रतिकूल बाजु मांडता येईल. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास दहा हजार एक रुपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय येणाऱ्या संघास सात हजार एक रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय संघास पाच हजार एक रुपये, याशिवाय कनिष्ठ महाविद्यालय संघासाठी उत्तेजनार्थ तीन हजार एक रुपये, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. तरी स्पर्धेत जास्तीत जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा व अधिक माहितीसाठी डॉ. विनोद देवरकर मो. 9421355073 यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि संयोजन समितीने केले आहे.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ डिसेंबर २०२५


## तिफण कविता महोत्सवात होणार सात पुस्तकांचे प्रकाशन




**कन्नड : (प्रतिनिधी) :** कन्नड तालुक्यातील अनेक कवी- लेखक सातत्याने लेखन करित असून त्यांची पुस्तके ही प्रसिद्ध होत आहे. कन्नड तालुक्यात साहित्यिक चळवळ चांगलीच बहरली असून अनेक नवोदित कवी पुढे येत आहेत. दरवर्षी तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवात पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे ही आयोजन करण्यात येते. आजपर्यंत अनेकांची पुस्तक प्रसिद्ध झालेली आहे. सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड , त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने रविवार दि. 11 जानेवारी रोजी कन्नड येथे संपन्न होणाऱ्या आठव्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अंबादास सगट कन्नड ) यांचे राष्ट्राचा गौरव : भिल्ल जमात, अय्युब पठाण लोहगावकर (मर्मबंध ), मनोज खुटे ( बाप रगत पेरतो ), ज्ञानेश्वर गायके ( पारखं झालं गाव ), लक्ष्मण वाल्डे ( ठोका काळजाचा ), समाधान निकम (माणसांच्या उत्क्रांतीची गोष्ट, संदीप वाकडे ( घामाने भिजलेली माती ) या सात पुस्तकांचे प्रकाशन वाचनालयाचे अध्यक्ष ,उद्योजक मानसिंहजी पवार, कविता महोत्सवाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी नारायण सुमंत, उदघाटक कवी राजेंद्र दिघे, कविसंमेलनाचे अध्यक्ष प्रतिभा खैरनार, पंजाबराव मोरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) अश्विनी लाठकर, गट शिक्षणाधिकारी रमेश ठाकूर ,प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सर्जेराव जिगे, अँड कृष्णा जाधव , प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, रामकृष्ण पवार ,डॉ. रुपेश मोरे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात सहभागी व्हावे ,असे आवाहन कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे , संशोधन परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रविण दाभाडे , सचिव अरुण थोरात आणि संयोजन समितीने केले आहे.

## जिंतूर तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा






**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** जिंतूर राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनाचे औचित्य साधून जिंतूर तहसील कार्यालयात बुधवारी मोठ्या उत्साहात ग्राहक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार शीतल कच्छवे होत्या. प्रमुख उपस्थितीत महिला तालुकाध्यक्ष आशाताई खिल्लारे, सचिव सचिन रायपत्रीवार, रमेश वाकळे, दिलीप देवकर, महेश देशमुख, आशिष कळमकर सावजी यांच्यासह अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात ग्राहकांनी खरेदी करताना आपल्या हक्कांबाबत सजग राहावे, फसवणुकीपासून संरक्षण कसे करावे, तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया, ग्राहक संरक्षण कायदा व शासनाच्या विविध योजना यांची माहिती देण्यात आली. जागरूक ग्राहक म्हणजे सक्षम समाजाचा पाया असल्याचे यावेळी प्रतिपादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप देवकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मनोज कारंजकर यांनी मानले. यावेळी तहसील कार्यालयाचे मनोज कारंजकर, संदीप खापरे, अनिकेत घुगे यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते.चौकटग्राहक दिनाचे महत्त्व24 डिसेंबर हा दिवस देशभरात राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. ग्राहकांचे अधिकार सुरक्षित ठेवणे, बाजारपेठेत पारदर्शकता निर्माण करणे आणि फसवणूक रोखण्यासाठी जनजागृती करणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. ग्राहक हक्कांबाबत जनतेत जागरूकता वाढविण्यासाठी विविध उपक्रम, चर्चासत्रे व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले जातात.सचिन रायपत्रीवार ग्राहक पंचायत तालुका सचिव


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ डिसेंबर २०२५

## छत्रपती संभाजी नगर विभागाचे राज्यस्तरीय राज्य पुरस्कार गाईड चाचणी शिबिर संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक २२ डिसेंबर २०२५ ते २५ डिसेंबर २०२५ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर येथे राज्यस्तरीय राज्य पुरस्कार गाईड चाचणी शिबिर संपन्न झाले. सदरील शिबिरात छत्रपती संभाजीनगर विभागातील बीड, बुलढाणा, जालना हिंगोली, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एकूण १३८ गाईड्स व २७ गाईड कॅप्टन सहभागी झाल्या होत्या.

सदरील शिबिराचे शिबिर प्रमुख म्हणून श्रीमती प्रिया आधाने (लिडर ट्रेनर गाईड) यांनी काम पाहिले तसेच शिबिर सहाय्यक म्हणून श्रीमती वैशाली आठवले, श्रीमती सोनाक्षी तेलंगे, श्रीमती सोनिया शिरसाट, श्रीमती माधुरी दळवी, श्रीमती रेखा पानसरे, श्रीमती स्वप्ना शिंदे, श्रीमती स्नेहलता हिवर्डे, श्रीमती स्वाती नाईक यांनी काम पाहिले.

सदरील शिबिरात राज्य कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार लेखी तोंडी प्रत्यक्ष स्वरूपाच्या परीक्षा घेण्यात आल्या. सदरील शिबिरात राष्ट्रीय स्तरावरील लक्ष्मी मुजुमदार अवॉर्ड प्राप्त झालेल्या श्रीमती मीनाक्षी गाडेकर धर्मवीर संभाजी विद्यालय छत्रपती संभाजी नगर यांचे स्वागत करण्यात आले.

सदरील शिबिरास विविध मान्यवरांनी भेटी देऊन गाईड्स यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिरा करता श्रीमती दीपमाला मोरे, श्री हारचंद जारवाल, श्रीमती जोशना पिंपरीकर, श्री विजय घुसिंगे यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सदरील शिबिर संपन्न झाले.

## चांदोबाच्या नगरीत

चांदोबाच्या नगरीत
फुलांची झाडे
सुगंधाने दरवळती
उंच उंच वाडे

चांदोबाच्या नगरीत
रात्रीची शाळा
विद्यार्थी म्हणून
चांदण्या होतात गोळा

चांदोबाच्या नगरीत
ढगांचा लपंडाव
जोराची हवा सुटलाच
होते त्यांची धावाधाव

चांदोबाच्या नगरीत
आकाश निळे निळे
ढगांच्या गर्जनेने
भित्रा ससा पळे



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. ९०११५५९१०६

## कावळे दादा

कावळे दादा कावळे दादा असं काय झालं
घागरीतलं पाणी सारं सरूनिया गेलं

खडे टाकून टाकून गेली भरून घागर
नाही मिळाले रे गड्या पाणी पिण्या थेंबभर

रानं जळली रे सारी शेतशिवारात आग
दुष्काळाच्या तडाख्यात करपून गेलं जग

झाडं तोडण्याचं पाप कसं माणसांनी केलं
ढग रुसून बसता पाणी हरवून गेलं

असं तापलं हे पाणी दिसे कावळ्या मरण
पाण्याविना अधुरीच साऱ्या जीवाची तहान

माळरानावर लावू एक एक झाडं खास
अन् बोलवू पावसाला पुन्हा येईल पाऊस



**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

# वीर बाल दिन : बालशौर्याचा अमर इतिहास

वीर बाल दिन : बालशौर्याचा अमर इतिहास- डॉ. राजेंद्र बगाटे२६ डिसेंबर हा दिवस भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जाणीवेत 'वीर बाल दिन' म्हणून विशेष महत्त्व प्राप्त करून आहे. हा दिवस केवळ एका दु:खद ऐतिहासिक घटनेचे स्मरण करून देणारा नाही, तर तो बालशौर्य, त्याग, श्रद्धा, स्वाभिमान आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा अमर संदेश देणारा आहे. शीख धर्माचे दहावे गुरु, गुरु गोविंदसिंह महाराज यांचे सुपुत्र साहिबजादे जोरावर सिंह आणि साहिबजादे फतेह सिंह यांनी अत्यंत कोवळ्या वयात दिलेले बलिदान हे भारतीय इतिहासातील नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या इतिहासातील दुर्मिळ आणि अंतर्मुख करणारे उदाहरण आहे. त्यांच्या बलिदानाने बालकांच्या धैर्याची, नैतिक ठामपणाची आणि श्रद्धेची उंची किती महान असू शकते, हे जगासमोर स्पष्ट झाले.सतराव्या शतकातील भारत हा राजकीय अस्थिरता, सत्तासंघर्ष आणि धार्मिक दडपशाहीने ग्रासलेला होता. मुघल सत्तेच्या काळात अनेक प्रांतांत सामान्य जनतेवर अन्याय, अत्याचार आणि जबरदस्तीचे धर्मांतर लादले जात होते. अशा कठीण काळात गुरु गोविंदसिंह महाराजांनी अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, धर्मस्वातंत्र्य जपण्याचा आणि मानवी स्वाभिमान टिकवण्याचा संदेश दिला. त्यांनी खालसा पंथाची स्थापना करून शौर्य, समता, त्याग आणि न्याय या मूल्यांना सामाजिक आणि धार्मिक अधिष्ठान दिले. याच मूल्यांच्या वातावरणात साहिबजाद्यांचे बालपण घडले होते. त्यामुळेच संकटाच्या क्षणी त्यांनी भीती, लोभ किंवा सत्तेच्या दबावाला शरण न जाता सत्याची आणि श्रद्धेची वाट स्वीकारली.साहिबजादे जोरावर सिंह आणि फतेह सिंह यांना सरहिंद येथे नेऊन इस्लाम स्वीकारण्याचा अमानुष दबाव टाकण्यात आला. वयाने अत्यंत लहान असूनही त्यांनी आपली श्रद्धा बदलण्यास ठाम नकार दिला. हा नकार बालहट्टाचा नव्हता, तर तो त्यांच्या संस्कारांचा, आत्मसन्मानाचा आणि धर्मनिष्ठेचा स्पष्ट प्रत्यय होता. अखेरीस त्यांना जिवंत भिंतीत चिणून मारण्यात आले. ही घटना ऐकतानाही मन सुन्न होते. मात्र या अमानुषतेसमोरही साहिबजाद्यांचे धैर्य, शांतता आणि निश्चय ढळला नाही. म्हणूनच त्यांचे बलिदान केवळ शोकांतिकेपुरते मर्यादित न राहता, शौर्य, श्रद्धा आणि मूल्यनिष्ठेचे अमर प्रतीक ठरले.'वीर बाल दिन' हा दिवस आपल्याला बालकांविषयीची पारंपरिक दृष्टी पुन्हा तपासायला भाग पाडतो. सामान्यतः बालक म्हणजे निरागस, खेळकर आणि संरक्षणाची गरज असलेले जीव, अशी आपली धारणा असते. मात्र साहिबजाद्यांचे उदाहरण सांगते की शौर्य, निष्ठा आणि नैतिक ठामपणा हे वयावर अवलंबून नसतात. लहान वयातही मोठ्या विचारांची उंची गाठता येते. मृत्यूच्या छायेत उभे राहूनही त्यांनी दाखवलेले साहस आणि आत्मसन्मान अनेक प्रौढांनाही अंतर्मुख करणारे आहे. म्हणूनच 'वीर बाल' ही संज्ञा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची खरी ओळख ठरते.आजच्या आधुनिक काळात वीर बाल दिनाचा संदेश अधिकच अर्थपूर्ण वाटतो. आजची बालपिढी वेगळ्या प्रकारच्या संकटांना आणि आव्हानांना सामोरी जात आहे. शिक्षणातील तीव्र स्पर्धा, यशाचा ताण, भौतिक सुखांचा अतिरेक, डिजिटल माध्यमांचा प्रभाव, सामाजिक माध्यमांवरील तुलना आणि नैतिक गोंधळ यामुळे अनेक मुले मानसिक तणावाखाली आहेत. अशा परिस्थितीत साहिबजाद्यांचे जीवन आणि बलिदान बालकांसाठी मूल्याधारित आदर्श ठरू शकते. त्यांनी दाखवून दिले की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी सत्य, श्रद्धा आणि स्वाभिमानाशी तडजोड करू नये.शिक्षणव्यवस्थेच्या दृष्टीनेही वीर बाल दिनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इतिहास हा केवळ परीक्षेसाठी पाठ करण्याचा विषय न राहता, तो जीवनमूल्यांची शिकवण देणारा असावा. साहिबजाद्यांचे बलिदान विद्यार्थ्यांना धैर्य, निष्ठा, आत्मसन्मान, सहिष्णुता आणि नैतिक ठामपणाचे महत्त्व समजावून सांगते. शाळा आणि महाविद्यालयांनी वीर बाल दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम म्हणून न साजरा करता, त्यामागील अर्थ आणि संदेश विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर रुजवला पाहिजे. अशा मूल्याधारित शिक्षणातूनच संवेदनशील, जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक घडू शकतात.कुटुंबसंस्थेची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. पालक हे मुलांचे पहिले गुरु असतात. मुलांना केवळ यशस्वी होण्याचीच नव्हे, तर सज्जन, प्रामाणिक आणि धैर्यवान माणूस होण्याची शिकवण घरातूनच मिळाली पाहिजे. साहिबजाद्यांच्या कथा मुलांना सांगताना त्यामागील भावनिक आणि नैतिक अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे. बलिदान म्हणजे नेहमीच प्राण देणे नसते, तर सत्यासाठी उभे राहणे, चुकीशी तडजोड न करणे आणि अन्यायाला न घाबरणे हेही बलिदानाचेच रूप आहे, हा संदेश मुलांच्या मनावर बिंबवला पाहिजे.वीर बाल दिन धार्मिक सहिष्णुता आणि श्रद्धेच्या स्वातंत्र्याचाही संदेश देतो. साहिबजाद्यांनी कोणावरही आपली श्रद्धा लादली नाही, मात्र स्वतःच्या श्रद्धेसाठी प्राणांची आहुती दिली. हे उदाहरण श्रद्धेचा अधिकार आणि वैचारिक स्वातंत्र्य किती मौल्यवान आहे, हे अधोरेखित करते. आजच्या काळात जेव्हा असहिष्णुता, द्वेष आणि मतभेद वाढताना दिसतात, तेव्हा वीर बाल दिन आपल्याला संयम, सहअस्तित्व आणि मानवतेची आठवण करून देतो.माध्यमांची जबाबदारीही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. वीर बाल दिनासारख्या दिवसांचा उपयोग केवळ भावनिक किंवा सनसनाटी मांडणीपुरता मर्यादित न ठेवता, त्यामागील मूल्ये आणि प्रेरणा समाजापर्यंत पोहोचवली पाहिजेत. साहिबजाद्यांचे बलिदान हे शोककथा न राहता, नैतिक बळ देणारी प्रेरणागाथा म्हणून मांडले गेले पाहिजे, जेणेकरून समाजाला त्यातून सकारात्मक दिशा मिळेल. एकूणच, 'वीर बाल दिन' हा केवळ इतिहासातील एका बलिदानाची आठवण करून देणारा दिवस नाही, तर तो भारतीय संस्कार, मूल्यपरंपरा आणि मानवी स्वाभिमानाचा गौरव करणारा दिवस आहे. हा दिवस आपल्याला स्वतःकडे पाहायला लावतो—आपण आपल्या बालकांना कोणते संस्कार देतो, कोणते आदर्श त्यांच्या समोर ठेवतो आणि कोणत्या समाजाची उभारणी करत आहोत? साहिबजादे जोरावर सिंह आणि फतेह सिंह यांचे बलिदान आपल्याला हेच शिकवते की श्रद्धा, सत्य आणि स्वाभिमानासाठी उभे राहणे हीच खरी वीरता आहे.म्हणूनच २६ डिसेंबर हा दिवस केवळ श्रद्धांजली अर्पण करण्यापुरता मर्यादित न राहता, मूल्यनिष्ठ जीवनाचा संकल्प करण्याचा दिवस ठरावा. साहिबजाद्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात धैर्य, प्रामाणिकपणा, सहिष्णुता आणि मानवतेची कास धरली, तरच 'वीर बाल दिन' साजरा करण्याचा खरा अर्थ साकार होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल -
bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ डिसेंबर २०२५


# माणसाच्या दुःखाला फुंकर घालणाऱ्या कविता..

**यु**वा कवी संदीप वाकडे यांचा" घामाने भिजलेली माती"हा पहिला कवितासंग्रह लीला प्रकाशन पुणे तर्फे प्रकाशित प्रकाशित झाला असून मराठवाड्यातील सदा दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या बळीराजा बापाच्या समस्या अभिनय प्रखरपणे मांडल्या आहेत. या समस्या मांडत असताना व्यवस्थेला प्रश्न विचारून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी हातात लेखणी घेतल्याचे दिसून येते. त्यांच्या ' माय ' या पहिल्याच कवितेतआईच्या महानतेचे , त्यागाचे आणि वात्सल्याचे सुंदर चित्र उभे राहिले असून आईचे कष्ट, त्याग आणि निस्वार्थ प्रेम अत्यंत भावुकपणे व्यक्त केले आहे."माय झिजविती काया राबते दिनरात घरात कष्ट करून जीवनीसुख वाटते जगात.."अशा सुख वाटणाऱ्या आईचे मोल जगात कशाशीही होऊ शकत नाही.तिचे कार्य दैवी आहे आणि तिचे ऋण फेडणे अशक्य आहे. हा संदेश पुढील ओळीत कवी देतो.."जीवनाच्या या देव्हाऱ्यातमाय वसे हृदयात कार्य तिचे महान राहू तिच्या ऋणात.." तर' बाप' या कवितेत रात्रंदिवस घरासाठी रानात घाम गाळणाऱ्या बापाचे चित्रण करताना तो बाप म्हणजे घरातील कष्टाचं चालतं बोलतं विद्यापीठ आहे. बाप लेकराच्या भल्यासाठी रात्रंदिवस कष्टत असतो काटेरी वाटा तुडवीत असतो तो भावनेचा सागर असूनही कधी रडत नाही फक्त मनात झुरत असतो आणि उभी हयात लेकरू मोठे करण्यासाठीच राबत असतो अशा रीतीने कृतज्ञतापूर्व बापासाठी कवी म्हणतो.. "बाप भावनेचा सागर मनी मन झुरतो लेकरा करण्या मोठा बाप हयात राबतो.. बाप चालतं बोलतं जणू विद्यापीठ कष्टाचं बाप तळपे उन्हात सोनं करण्या लेकराच.."तर ‘घोषणांचा पाऊस’ या कवितेतशासन, राजकारण आणि निवडणुकांच्या काळात होत राहणाऱ्या खोट्या आश्वासनांवर तीक्ष्ण व्यंग करणारी आहे. कवीने ‘पावसाच्या सरींसारख्या कोसळणाऱ्या घोषणां’ची उपमा वापरून सत्ताधाऱ्यांच्या आश्वासनांचा दिखावा प्रभावी शब्दांत उलगडला आहे. ही कविता केवळ शासन व्यवस्थेवर टीका करत नाही तर जनतेला जागरूक होण्याचा संदेशही देते. समाजातील राजकीय वास्तवाचे सत्यचित्रण करणारी, प्रभावी आणि चिंतनास प्रवृत्त करणारी ही सामाजिक-जाणीवेची कविता आहे. या कवितेत .."नका करू घोषणा फक्त द्या हमीभाव शेतीमाल शेतकऱ्याचा विकतोय कवडीमोल राव"शेतकरी राजाची ही खरी समस्या आहे की त्याला शेतीमातीत घाम गाळून पिक पिकवता येतं पण त्या सोन्यासारख्या शेतीमालाला हमीभाव नसल्याने शेतकरी आयुष्यभर कर्जबाजारीच राहतो. कारण शेतीमाल येण्यासाठी बी खत औषधी याचा खर्च भरमसाठ होतो आहे कारण बी- बियाणे औषधी यांचे भाव कधीचेच गगनाला भिडले आहे.ही बळीराजा बापाची व्यथा मांडताना शेतकऱ्याला हमीभाव द्या ही रास्त मागणी कवी संदीप वाकडे करतात.आज जमिनीची मालकी, बांधाची सीमारेषा, यामुळे गावोगावी उद्भवणारी भांडणे या वाढताना पाहून कवी मन हळहळते व 'बांधावरचं भांडण' ही कविता जन्मास येते.या रचनेत मातीचं घर, मातीचा स्वभाव, शेजारपाजारी ताणतणाव, अचानक वाढलेला राग यामुळे गावचे शांत वातावरण क्षणात कसं पेटतं, हे कवीने प्रभावीपणे दाखवले आहे. तर ‘जगाचा विश्वास!! विठूराया!!’ या कवितेत पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तीची प्रखर अभिव्यक्ती आहे. कारण कवी वारकरी संप्रदायाच्या वातावरणात वाढलेला असून कवीचा गाव, परिसर हा वारकरी संप्रदायाचा पगडा असलेला आहे. कवीने पंढरीचा देव, विठोबा याच्यावरील अढळ श्रद्धा, अपार विश्वास आणि भक्तांच्या भावविश्वातील त्याचे स्थान अतिशय भावपूर्ण रीतीने मांडले आहे. “जगाचा विश्वास” म्हणत कवी विठ्ठलाला संपूर्ण समाजाचा आधारस्तंभ व विश्वस्त देव मानतो.कवितेत विठ्ठलाचे विविध रूप उल्लेखून तो सर्वांचा राखणदार, संकटातील आधार, दुःख हाेरवणारा, आनंद देणारा, करुणामय भगवंत असल्याचे प्रभावी चित्र उभे राहते. “संकट समयी विविध रूपातउभा मानवात तू विठ्ठला” या ओळीत देव हा केवळ देव्हाऱ्यातील मूर्ती नसून मानव रूपातही संकटात मदत करणारा संवेदनशील शक्ती आहे, हा सुंदर संदेश दिला आहे.कवीची भावभूमी अत्यंत भक्तिरसपूर्ण आहे. विनवणी, आश्रयाची पोकळी, मनातील विश्वास, समाजातून अन्याय नष्ट होण्याची इच्छा—या भावना ओळीओळीतून उमटतात. “जगात अन्याय नको वाटे मना” या आवाहनातून समाजप्रेम, न्यायनिष्ठा आणि सामूहिक कल्याणाची आकांक्षा व्यक्त होते.एकंदर, ही कविता भक्तिरसाने ओथंबलेली असून श्रद्धा, समर्पण, विश्वास आणि नैतिकतेचा संदेश देणारी आहे. सोपी, प्रभावी, भावस्पर्शी भाषा व लयबद्ध विनवणीमुळे कविता वाचकाच्या मनाला भिडते आणि विठ्ठलभक्तीचा ऊबदार अनुभव देते.कवी कविता लिहिताना जरी स्वांत सुखाय लिहीत असला तरी कविता लिहिण्या मागं त्याचा काहीतरी उद्देश असतो. कवी संदीप वाकडे यांच्या कविता वाचताना शेतकऱ्यांचे दुःख दैन्य दारिद्र्य याचे चित्रण करताना शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळावा शेतकरी सुखी व्हावा ही विश्व प्रार्थना जागोजागी कवी करतो आहे असे आढळून येते.कवी" स्वप्न पाहिले मी "या कवितेत..ग्रामीण शेतकरी जीवनातील आशावाद, संघर्ष आणि उज्ज्वल भविष्यासाठीची प्रखर आस यांचे हृदयस्पर्शी चित्रण करताना कवीने ‘स्वप्न’ या प्रतीकातून आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची, समाजाच्या प्रगतीची आणि शेतकरी जीवनातील आनंदाची सुंदर कल्पना शब्दबद्ध केली आहे.कवीच फार मोठं मागणं नसून बळीराजा बापाच्या कुटुंबासाठी सुरक्षित छत, आनंदी वातावरण आणि दुःखमुक्त जीवन असावं ही आर्त हाक पानोपानी दिसत आहे.. दिवस-रात्र कष्ट करणारा शेतकरी देवाकडे केवळ समृद्धी नव्हे तर दुःख निवळण्याची विनवणी करतो. कवीने आई व धरतीमाते प्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे; राज्यकर्त्यांनीही शेतकऱ्यांच्या वेदना समजून उपाय करावेत, अशी अपेक्षा कवी व्यक्त करतो.यानंतर तो मुलांच्या भवितव्याचे स्वप्न दाखवतो. मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावं, दुःखाच्या वारशातून मुक्त होऊन सन्मानाने जगावं, अशी त्याची इच्छा आहे. शेवटी भरघोस पिकं, भरलेले धान्यकोठार, आनंदी शेतकरी अशी समृद्धीची प्रतिमा उभी करीत कविता अत्यंत आशावादी सूर लावते.एकंदर, ही कविता शेतकऱ्याच्या मनातील वेदना आणि त्याच वेळी त्याच्या न हरता जपलेल्या आशेचा मिलाफ आहे. वरील कविता संग्रहात सोपी, भावपूर्ण भाषा, वास्तवाशी घट्ट नातं आणि उज्ज्वल भविष्याची सकारात्मक उमेद यामुळे कविता वाचकाच्या मनाला भिडते. मराठी वाचक या कवितासंग्रहाचे निश्चित स्वागत करतील मला आशा आहे.कवी संदीप वाकडे यांच्या पुढील साहित्य वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!


**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**


## जनसेवा करण्याचे भाग्य आपल्याला लाभले हाच खरा आनंद : उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर



**कन्नड(अरुण थोरात):** जनसेवा करण्याचे भाग्य आपल्याला लाभलेय, या सारखा दुसरा आनंद जगात नाही. असे मनोगत धाराशिव चे निवासी उपजिल्हाधिकारी तथा कन्नड चे माजी तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी व्यक्त केले आहे. ते दि. २५ डिसेंबर रोजी कन्नड येथे तलाठी संघटना, महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित निरोप समारंभ प्रसंगी बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ना.तहसीलदार दिलीपकुमार सोनावणे हे होते. सत्काराला उत्तर देतांना श्री कडवकर म्हणाले की, कोणी एक व्यक्ती काही करु शकत नाही.

ते सर्व समाज करतो. त्यांना उंचीवर नेण्याचे काम आपण करावे. कन्नड इतका सुसंस्कृत तालुका पाहिला नाही. बीन कामाचा माणूस कधी माझ्याकडे आला नाही. हे सर्व श्रेय माझ्या महसूल कर्मचाऱ्यांना जाते. प्रत्येक उपक्रमात आपण पहिला नंबर राहिलो. आपण काही करत नाही तालुक्यातील वातावरण चांगले काम करुण घेतले. मतदार नोंदणी, मतदार टक्केवारीत आपण रेकार्ड केला. याचे श्रेय मतदान अधिकारी कर्मचाऱ्यांनी केले, या मंडळीने जीवाचे रान करुण काम केले. येथील शेतकरी संघटनेचे कौतुक वाटते ही मंडळी समाजाचे प्रश्न घेऊण येतात. मोर्चा आपल्याकडे दंडुके घेऊण येत नाही. त्यांचे प्रश्न समजून घेणे गरजेचे जनतेचे प्रश्न समजून घेणे हीच खरी मानवता.

आपत्ती काळात आपले कर्मचारी गावात मुक्काम करून होते. तालुक्यातील माणसे जगातील सर्वात प्रेमळ वाटतात. कविता कोणीही लिहीत नाही ज्याला भावना आहे तोच कवी बनतो. आपण सामान्य माणूस नाही. लोक आपल्याकडे कोणत्यान कोणत्या आशेने येतात. त्याची दखल घेण्याचे काम आपले आहे. काम ही न संपणारी प्रक्रिया आहे. प्रत्येकाने ठरवावे समाज आहे म्हणून मी आहे. जनसेवेची सेवा करण्याचे भाग्य आपल्याला लाभलय त्याच्या सारखा दुसरा आनंदच नाही. आपल्या जबाबदार्या ऋदयातून पुर्ण करण्याचे काम आहे. आपल्याकडे येणाऱ्याशी आपुलकीने वागा. आपल्याला नोकऱ्या या करतोय ती आपल्या कुटूंबाची जबाबदारी समजून काम करा. आपण शुध्द अंतकराने केलेल्या कामाचा परिणाम आपल्या कुटूंबावर होतो. येणाऱ्या पीढी वर याचा परिणाम होत असतो. सर्व अधिकारी चांगले असतात. जगात दगडाला पाझर फुटतो. परंतू ते त्याला समजायला हवा. असे मत व्यक्त केले. सुत्रसंचालन प्रविण दाभाडे यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथी अनिल सुर्यवंशी, महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतिष भदाणे, तालुकाध्यक्ष बाळू घटे, जेष्ठ साहित्यिक डॉ. रमेश सुर्यवंशी, वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोम्पे, राधा कडवकर, डॉ. सदाशिव पाटील, एड.चंदू शहा, चंद्रकांत देशमुख, शेखर शिंदे, प्रकाश बोरसे, शिवाजी थेटे, आदी सह महसूल कर्मचारी उपस्थित होते.